# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दूरध्वनी क्र. २४०१०४३७/२४०२०७८१
Visit us at : http://mpcb.gov.in
Email : eb@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, २ रा मजला,
शीव माटुंगा स्किम रोड क्र. ८
शीव सर्कलसमोर, शीव (पूर्व)
मुंबई - ४०० ०२२

महाराष्ट्र

"आपली सेवा आमचे कर्तव्य"

जा.क्र. मप्रनि/आस्था/ब- १०७८ दिनांक ०७/०८/२०२५

## परिपत्रक

विषयः कार्यालयातील कामकाजात कागदविरहीत (Paper Less) कार्यप्रणाली सुरु करण्याबाबत

शासनाच्या धोरणानुसार शासकीय कामकाजात संगणकाचा अधिकाधिक वापर करुन शासकीय कामकाज गतिमान व्हावे, कामकाजात सुसूत्रता यावी, दस्तऐवज व माहिती सुरक्षित रहावी. तसेच निर्णय प्रक्रिया गतिमान व सुलभ होऊन कार्यालयीन कामकाज सुरळीत व्हावे यासाठी मंडळामध्ये कागदविरहीत (Paper Less) कार्यप्रणाली सुरु करण्यात येत आहे.

दैनंदिन कामकाजात प्राप्त होणाऱ्या टपालावरील कार्यवाही, विविध प्रकरणांचे प्रस्ताव, टिप्पणी इत्यादीवरील कार्यवाही गतिमान होण्यासाठी शासनाने कागदविरहीत (Paper Less) कामकाजावर भर दिला आहे. या बाबीचा विचार करता मंडळाच्या मुख्यालय व सर्व क्षेत्रीय कार्यालये, प्रयोगशाळा यांना सर्व प्रकारच्या कामकाजासाठी कागदविरहीत कार्यपध्दतीचा अवलंब दिनांक ०१/०८/२०२५ पासून करण्याबाबतच्या सूचना या परिपत्रकाद्वारे देण्यात येत आहेत.

सन २०२० मध्ये उद्भवलेल्या कोविड साथीमध्ये मंडळामध्ये कार्यालयीन कामकाज सुरळीत होण्यासाठी IMIS मोडयुलच्या Office Note Management मधून टिप्पणी सादर करण्याची सुविधा करण्यात आली होती, परंतु सदर कार्यप्रणालीचा वापर कालांतराने कमी झाला असल्याचे निदर्शनास आले आहे.

कागदविरहीत कार्यप्रणालीसाठी IMIS मोडयुलद्वारे सर्व प्रकारच्या कार्यालयीन टिप्पणी,प्रस्ताव मंडळातील सर्व विभाग/कार्यालयांसाठी सादर करावयाच्या आहेत. त्या अनुषंगाने सदर Office Note Module अद्ययावत करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने सर्व विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी दिनांक ०१/०८/२०२५ पासून कार्यालयीन टिप्पण्या IMIS मोडयुलमधून Office Note Management मार्फत सादर करण्याबाबत आपल्या नियंत्रणाखालील अधिकारी व कर्मचारी यांना अवगत करावे व तसे निदेश दयावेत.

सदर परिपत्रक दिनांक ०१/०८/२०२५ पासून अंमलात येत असून, सदर परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करावयाचे आहे.

(डॉ. अविनाश ढाकणे, भा.प्र.से.)
सदस्य सचिव

प्रति,

१.हवा प्रदूषण निवारण अभियंता/जल प्रदूषण निवारण अभियंता/ सहायक सचिव (तांत्रिक)/ प्रधान वैज्ञानिक अधिकारी/ मुख्य लेखा अधिकारी/ विधी अधिकारी-१/२/सहायक सचिव (आस्थापना)/कार्यकारी अभियंता/प्रादेशिक अधिकारी, मुख्यालय/BMW/सांख्यिकी अधिकारी/

२. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, मध्यवर्ती प्रयोगशाळा, महापे, नवी मुंबई/पुणे

३. प्रादेशिक अधिकारी-मुंबई/ठाणे/कल्याण/रायगड/नवीमुंबई/पूणे/नशिक/नागपूर/ छत्रपती संभाजीनगर/कोल्हापूर/अमरावती/चंद्रपूर.

४. उप-प्रादेशिक अधिकारी-मुंबई-१/मुंबई-२/मुंबई-३/मुंबई-४/ठाणे-१/ठाणे-२/तारापूर-१/ तारापूर-२/नवी मुंबई-१ /नवीमुंबई-२/तळोजा/कल्याण-१/कल्याण-२/कल्याण-३/भिवंडी/ रायगड-१/रायगड-२/महाड/कोल्हापूर/सांगली /रत्नागिरी/चिपळूण/पूणे-१/पूणे-२/पिंपरी-चिंचवड/सातारा/सोलापूर/ छत्रपती संभाजीनगर/ जालना/ नांदेड/ नाशिक/अहमदनगर/जळगाव/धुळे/नागपूर-१/नागपूर-२/भंडारा/चंद्रपूर/अमरावती-१/ अमरावती-२/अकोला/परभणी/लातूर/चंद्रपूर

५. वैज्ञानिक अधिकारी, प्रादेशिक प्रयोगशाळा, ठाणे/पूणे/नाशिक/चिपळूण/ छत्रपती संभाजीनगर/चंद्रपूर

६. अध्यक्ष कक्ष/सदस्य सचिव कक्ष

७. संकेतस्थळ, पर्यावरण माहिती केंद्र, म. प्र. नि. मंडळ, मुंबई

८. EC-MPCB/भांडारशाखा

९. परिपत्रक नस्ती- २०२५